**।। श्री गणराज समर्थ ।।**

# दावी गणेशा निजपादुकांते

## (प्रार्थना स्तोत्र)

श्री मोरया मंगलमूर्ति-राजा । बुद्धीश्वरा वेदमया विराजा ।।
वंदुनिया प्रार्थितसे तुला तें । दावी गणेशा निजपादुकांते ।।१।।

मी तो दयाळा अति पापखाणी । पापें मलिना मम पूर्ण वाणी ।।
रक्षी परि या शरणांगताते । दावी गणेशा निजपादुकांते ।।२।।

विघ्नेश्वरा विन्घविनाशदक्षा । आतां पुरे ही मज देहशिक्षा ।।
जाळी दयाळा मम पातकांते । दावी गणेशा निजपादुकांते ।।३।।

त्वां तारिला कोळिवरीष्ठ नामा । तैसा दुजा पापमहोधि शामा ।।
ते आठवी या समयीहि नाते । दावी गणेशा निजपादुकांते ।।४।।

रामासि जेव्हां दशकंठ भारी । झाला तघी संकट कोण वारी ।।
तों तूंच हेरंब अशी कथा ते । दावी गणेशा निजपादुकांते ।।५।।

मत्स्यावतारी हरि पाय पूजी । कुर्मावतारीहि तसा तुलाजी ।।
वाराह मायूरग उत्तरी तें । दावी गणेशा निजपादुकांते ।।६।।

नृसिंह दैत्ये जधिं पीडियले । तेव्हा त्वये त्वत्पद आदरीले ।।
तूं रक्षिसी संकटि वामनाते । दावी गणेशा निजपादुकांते ।।७।।

श्री भार्गवे मायुरपत्तनात । केले तुझे उग्र तप प्रभूते ।।
श्रीकृष्णही सेवित पुष्टिपाते । दावी गणेशा निजपादुकांते ।।८।।

बौद्धे कुधर्मोन्नति सिद्ध व्हाया । संचितले बा तुझियाच पाया ।।
कल्कीहि तूझे वरदान घे ते । दावी गणेशा निजपादुकांते ।।९।।

श्रीव्यास दत्तात्रि-सुयज्ञ तैसा । चिंती स्वचित्तीं तव पाद कैसा ।।
ढुंढे तुवां तारियलेंच त्याते । दावी गणेशा निजपादुकांते ।।१०।।

श्री शंकरे त्या त्रिपुरा वधाया । दिग्वत्सरे चित्त दिले तपाया ।।
तूं मारवीसी मग त्या खलाते । दावी गणेशा निजपादुकांते ।।११।।

ब्रह्मा तुझे ध्यान करूनि चित्र । नाना जगा निर्मितसे विचित्र ।।
शंभू-हरी संहृति पालनांते । दावी गणेशा निजपादुकांते ।।१२।।

शेषे धराधारणकार्य व्हाया । तुझ्याच बा चिंतियले सुपाया ।।
पुष्पापरी श्रीहरी होय त्यांते । दावी गणेशा निजपादुकांते ।।१३।।

हा त्वत्प्रसादे रतिकांत देवा । केशांतकी स्वीकरवी स्वसेवा ।।
ऐशा तुझ्या गांऊ किती गतीते । दावी गणेशा निजपादुकांते ।।१४।।

श्री आदिमाया महिषादिकाते । मारावया शक्त न हो जधी ते ।।
तूंते तपूनी यश घेई ते ते । दावी गणेशा निजपादुकांते ।।१५।।

जे जे जगी थोर म्हणोनि झाले । त्यांहि परेशा तुज सेवियेले ।।
गांतां पुरेना फणिच्या मुखाते । दावी गणेशा निजपादुकांते ।।१६।।

त्वां सिंधु सिंदूरमुखा अनेकां । दैत्यांसि सम्मर्दुनि सर्व लोकां ।।
आनंद दिल्हा श्रृति हेचि गाते । दावी गणेशा निजपादुकांते ।।१७।।

आतां पुरे मी किती गाऊं लीला । सकृज्जपे ज्या हरिती कलीला ।।
ज्या वारिती दुर्धर आपदांते । दावी गणेशा निजपादुकांते ।।१८।।

भक्ताभिमानित्व जगीं प्रसिद्ध । ते काय माते कळले न सिद्ध ।।
त्वन्नाम मी आठवितो सदा ते । दावी गणेशा निजपादुकांते ।।१९।।

हे श्रीगणेशा जगदीशताता । सर्वस्व तूची मम तात माता ।।
वारी भवाख्या मम या गदाते । दावी गणेशा निजपादुकांते ।।२०।।

हे चिद्घना मंगलमूर्ती राया । संसारसिंधुत सुखे तराया ।।
त्वन्नामहो अंकुशधारिला तें । दावी गणेशा निजपादुकांते ।।२१।।